दै. प्रजावाणी दि. 09.03.25

# चिचोंलकरांच्या कारभारावर शिवसेनेने घेतला आक्षेप

वार्ताहर: नवीन नांदेड

नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याचे निरिक्षक ओमकांत चिचोलकर यांच्या कार्यपद्धतीवर शिवसेनेचे तालुकाप्रमुख उध्दव पाटील शिंदे यांनी आक्षेप घेतला असून चिंचोलकर मात्र यांनी हे आक्षेप फेटाळून आपण कायदेशीर काम करीत असल्याचे स्पष्ट केले आहे.

उद्धव शिंदे यांनी पोलिस अधिक्षकांची भेट घेऊन निवेदनसादर केले. दोन दिवसांपूर्वी अपघात केलेल्या आयचरला गुन्हा नोंद होण्यापूर्वी सोडून देण्यात आल्याबद्दल शिंदे यांनी आक्षेप घेतला आहे. या प्रकरणात गुन्हा नोंद करण्यास विलंब लावल्याने चिंचोलकर यांची बदली करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

उध्दव शिंदे व त्याचा मुलगा युवराज शिंदे हे आपल्या इनोव्हा गाडी (एमएच २६ सीपी ५१५१) जात होते. त्याच्या पाठीमागून येणाऱ्या आयचर गाडीने (आरजे ०९ जीई ३०५७) इनोव्हाला जोराची धडक देत अपघात केला. तिथून निघून जात असताना शिंदे व नागरिकांनी त्यांची गाडी पकडत आयचरसह चालकास ग्रामीण पोलिसाच्या स्वाधिन केले. परंतु, त्या वाहनास सोडून दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, पोलीस निरिक्षक चिंचोलकर यांनी आरोप सिद्ध करा, अन्यथा बदनामीच्या खटल्याला तयार रहा, असे आव्हान उद्धव शिंदे यांना दिले आहे.

## त्या वाहनात लसूण

जीवनावश्क वस्तू अपघातग्रस्त वाहनात असतील तर ते वाहन सोडून देण्याची तरतूद कायद्यात आहे. त्या वाहनात लसूण असल्याने सोडून देण्यात आले. अपघातग्रस्त वाहनात जिवितहानी नसल्याने ते सोडून देणे उचित होते, असे चिंचोलकर यांनी सांगितले.

दै. लोकपत्र दि. 09.03.25

# ग्रामीण पोलिसांचा पोलीस अधीक्षकांकडून सत्कार

नांदेड/प्रतिनिधी

ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये उत्कृष्टपणे काम करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा एस. पी. साहेब यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला आहे.

मागील काही महिन्यांम ध्ये ग्रामीण पोलिसांनी अवैध धंद्याच्या विरोधात मोठी कारवाई केली यामध्ये दारू जुगार अवैद्य रेती गांजा अवैध जनावर वाहतूक अवैधपणे शस्त्र बाळगणे यांचा समावेश आहे.



तसेच खून, खुणाचा प्रयत्न अशा गुन्ह्यातील आरोमींना तात्काळ अटक करून त्यांना जेल मध्ये पाठवले.१४ सराईत आरोपीवर एमपीडीएअंतर्गत कारवाई केली आहे. चोरी,जबरी चोरी,चेन स्नॅचिंग, मोबाईल स्नॅचिंग अशा गुन्ह्यांना आळा घातला आहे. महिला व मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विविध शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यक्रम घेऊन महिला विषयक कायद्याबाबत जनजागृती केली.

याबद्दल ग्रामीण पोलिसांच्या उत्कृष्ट कारवायांबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी यांनी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस अंमलदार सत्तार शेख, विक्रम वाकडे, शंकर माळगे, मारोती पचलिंगे, ज्ञानेश्वर कलंदर, विष्णू कल्याणकर, संतोष पवार, माधव माने, महिला पोलीस अंमलदार वैशाली घोनशेटवार यांचा सत्कार केला.